Shanti Education Society's

**A. G. Patil Polytechnic Institute, Solapur**

18 (2/2A) / 2, Pratap Nagar, Opp. S.R.P. Camp, Vijapur Road, Solapur- 413 008

Ph.No. – 0217 – 2341899, 6450740 Fax No. – 0217 – 2342220

www.agppi.com Email : agppi.contact@gmail.com

दि. २४.०९.२०१७

# महत्त्वाची सुचना

## "डॉ. पंजाबराव देशमुख वस्तीगृह निर्वाह भत्ता योजना" – शै. वर्ष २०१७-१८

**संदर्भ : १. शासन निर्णय : टीईएम / २०१६ / प्र.क्र. ५०१ / तांशि-४, दि. १३.१०.२०१६**

सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य शासनाने प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षातील प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी **"डॉ. पंजाबराव देशमुख वस्तीगृह निर्वाह भत्ता योजना"** अंमलात आणली असून सदर योजने अंतर्गत पात्र विद्यार्थ्यांच्या निर्वाह भत्त्याची रक्कम शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्याकरीता शासनाद्वारे https://mahadbt.gov.in हे संकेतस्थळ विकसित करण्यात आले आहे. तरी सदर सवलतीकरीता नमुद संकेत स्थळावर सर्व संबंधीत विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरावे व ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रिंट खाली नमुद आवश्यक कागदपत्रांसह कार्यालयात **शुक्रवार, दि. २९.०९.२०१७ पर्यंत** जमा करावे, याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी; अन्यथा होणाऱ्या आर्थिक नुकसानिस विद्यार्थी स्वतः जबाबदार राहिल.

**सदर योजनेकरिता नियम व अटी :**

१) विद्यार्थ्यांचे पालक अल्पभूधारक शेतकरी असावेत किंवा नोंदणीकृत मजूर असावेत.
२) जे विद्यार्थी राज्यातील महानगरातील (मुंबई व पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण क्षेत्रातील सर्व शहरे, औरंगाबाद, नागपूर) महाविद्यालयात प्रवेशित आहेत अशांना; प्रतिमहा रू. ३०००/- व अन्य ठिकाणासाठी प्रतिमहा रू. २०००/- इतका वस्तीगृह निर्वाह भत्ता मिळेल.
३) सदर निर्वाह भत्ता हा शैक्षणिक वर्षातील सुट्टीचा कालावधी वगळून उर्वरित १० महिन्यांच्या कालावधीकरिता मिळेल.
४) वरील संदर्भिय शासन निर्णयातील सर्व अटी व नियम लागू असतील.

**अर्जासोबत लागणारी आवश्यक कागदपत्रे (साक्षांकीत प्रती) :**

१) ऑनलाईन सादर केलेले ई.बी.सी. अर्ज
२) विद्यार्थ्यांच्या पालकांचे सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले अल्पभूधारक शेतकरीचे प्रमाणपत्र किंवा नोंदणीकृत मजूर असल्याचे प्रमाण पत्र
३) वस्तीगृह फी पावती व बोनाफाईड प्रमाणपत्र
४) अलॉटमेंट व प्रवेश कॉन्फर्मेइशन लेटर
५) शाळा सोडल्याचा दाखला
६) गॅप असल्यास ॲफिडेव्हीट (लागू असल्यास)
७) मागील परिक्षेच्या गुणपत्रिका (दहावी, बारावी किंवा तत्सम व सर्व सत्र)
८) Nationality & Domicile Certificate
९) चालु शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतल्याची फी पावती
१०) राष्ट्रीयकृत बँक पासबुक
(पासबुकवर खाते क्र., IFSC Code व MICR कोडचा स्पष्ट उल्लेख असावा)
११) आधार कार्ड
१२) बँक खात्याशी आधार कार्ड संलग्न केलेले प्रमाणपत्र

प्राचार्य

Principal
A. G. Patil Polytechnic Institute
Solapur

**टिप : सुलभ संदर्भ व अधिक माहितीकरिता संदर्भिय शासन निर्णयाची प्रत मेन इमारतीच्या सुचना फलकावर लावण्यात आली आहे.**

प्रत :

| | | | |
|---|---|---|---|
| 1) CE | 2) CO & IF | 3) EJ | 4) ME |
| 5) FY | 6) Mr. Mophare A. V. | 7) Web Prtal (Ms. Sarvade Madam) | |
| 8) N.B. : A- | B- | C- | 9) Admin. |